

मीडिया प्रमोशनच्या वतीने आयोजित केलेल्या बोट प्रदर्शनाची पाहाणी करताना सभापती प्रतापसिंह राणे, सुधीर पिल्लई, श्रीनिवास धेंपे, ब्रिगेडिअर एस. सी. के. पुरी आणि संयोजक केदार धुमे.

# मीडिया प्रमोशनच्या बोट प्रदर्शनाचे उद्घाटन

**पणजी** | दि. १७

**येथील** मीडिया प्रमोशनच्या वतीने आयोजित केलेल्या 'गोवा इंटरनॅशनल मरीन अ‍ॅण्ड बोट एक्स्पो'चे उद्घाटन विधानसभेचे सभापती प्रतापसिंह राणे यांच्या हस्ते कांपाल मैदान येथे करण्यात आले.

सकाळी १० ते संध्याकाळी ७ या वेळेत तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात स्थानिक, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील बोटी, त्याचबरोबर अत्याधुनिक उपकरणे, सेवा आणि सुविधा यांचा समावेश आहे.

उद्घाटनानंतर सभापती राणे यांनी धेंपो उद्योग समूहाचे चेअरमन श्रीनिवास धेंपे, एमपीटी चेअरमन पी. मारा पांडियान, फ्लॅग ऑफिसर कमांडिंग अ‍ॅडमिरल सुधीर पिल्लई आणि आल्दिया दि गोवाचे संचालक ब्रिगेडिअर एस. सी. के. पुरी यांच्यासमवेत प्रदर्शनाची पाहाणी केली. या वेळी त्यांच्यासोबत मीडिया प्रमोशनचे संचालक केदार धुमे आणि क्लाइव्ह सिक्वेरा उपस्थित होते.

राज्य सरकार, बीएमडब्ल्यू आणि गीतांजली यांचे सहकार्य लाभलेल्या या प्रदर्शनाचे प्रायोजक आल्दिया दी गोवा आहेत. यॉटिंग असोसिएशन ऑफ इंडिया, बोर्ड सेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया आणि गोवा यॉटिंग असोसिएशन भागीदार असलेल्या या प्रदर्शनाचे आशिया पॅसिफिक बोटिंग, व्हिवा गोवा आणि नवहिंद टाईम्स हे माध्यम प्रायोजक आहेत.